# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२

## ( सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत )

अप्रकाशित

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(गुरूवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) (क्रमांक १ ते १४ )**

(१) **सर्वश्री सुनिल प्रभू, अतुल बेनके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

‘‘पुण्यातील दोन तरुणांनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये सेक्सटॉर्शनमुळे आत्महत्या केल्याची घटना घडणे, सदरहू प्रकरणाचा तपास पोलीसांनी केला असता सदरहू दोन तरुणांना नग्न छायाचित्रे आणि व्हिडीओ सोशल मिडीयावर वायरल करण्याची धमकी देऊन दोघांना ब्लॅकमेल करण्यात येत असल्याने त्यास कंटाळून तरुणांनी अखेर टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न होणे, यामुळे पुणे शहरात खळबळ निर्माण झाल्याने पोलीसांनी सदर प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचा निर्णय घेऊन कार्यवाही करणे, सेक्सटॉर्शन रॅकेटचा माग काढत पुणे पोलीस राजस्थानातील अलवर जिल्ह्यातील लक्ष्मणगढ तालुक्यातील गुरुकोठडी गावात पोहोचले असता संपूर्ण गावच सेक्सटॉर्शनचे रॅकेट चालविण्यात येत असल्याची धक्कादायक व खळबळजनक माहिती उघडकीस येणे, सदरहू प्रकरणातील मुख्य आरोपी अन्वर खान याला राजस्थानात सापळा रचून व गुंगारा देण्याचा प्रयत्न केला असता अडीच किलोमिटर पाठलाग करुन त्यास पुणे पोलीसांनी अटक करणे, सदरहू गुरुकोठडी गावातील २५०० जण सेक्सटॉर्शनचे रॅकेट चालवित असल्याची कबुली आरोपीने देणे, प्रथम सोशल मिडीयावर बनावट अकाऊंट बनवून रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या महिलेशी फोनवर बोलण्यासाठी आमिश दाखविण्यात येणे, यानंतर व्हिडीओ क़ॉल करुन जाळयात अडकलेल्या व्यक्तीला फोटो शेअर करण्यात सांगण्यात येणे, हे फोटो मॉर्फ करुन टार्गेट केलेल्या व्यक्तीला आक्षेपार्ह अवस्थेत दाखवले जाते, तद्नंतर तोच फोटो वा व्हिडीओ सोशल मिडियावर शेअर

करण्याची धमकी देऊन लाखो रुपये उकळण्यात येऊन आर्थिक लूट करण्यात येत असल्याचे तपासातून उघड होणे, राजस्थानमध्ये सुरु असलेल्या या सेक्सटॉर्शनच्या रॅकेटमध्ये टीसी व न्यायाधिश तसेच राज्यातील सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरीकांना देखील ब्लॅकमेल करुन आर्थिक फसवणूक करण्यात असल्याचे अनेक घटनांतून निदर्शनास येणे, मुंबईसह राज्यात मोठ्या प्रमाणात सोशल मिडियाचा वापर करुन सेक्सटॉर्शनच्या घटना घडत असणे, यामध्ये कमी प्रमाणात घटना उघडकीस येत असणे, अशा घटनांमुळे समाजावर दुष्परिणाम होऊन देशाचे भवितव्य असलेले उच्च शिक्षीत तरुण पिढी वाया जाऊन जीव गमावण्याचा निर्माण झालेला गंभीर धोका, सदरहू प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन सायबर क्राईम ॲक्टमध्ये कठोर तरतुद करुन कायदा मंजूर करुन त्याची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(२) **श्री.सुभाष धोटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"राज्यातील चंद्रपूर जिल्हा स्थित कोरपना तालुक्यातील नांदाफाटा आवारपुर बीबी या परिसरातील जवळपास ११०० ते १२०० नागरिकांचे आधारकार्ड, बँक पासबुक सन २०१८ मध्ये एजंट मार्फत प्रधानमंत्री आवास योजनेचे अर्ज भरून जमा करण्यात आले असणे; ज्या नागरिकांना राहण्यासाठी घरे नाहीत, ज्यांना घराची अत्यावश्यकता आहे, अशा लोकांसाठी प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र गृहनिर्माण सोसायटी कडे सादर करण्यात आल्यानंतर माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये या योजनेला मंजुरी मिळाली असणे; ज्यांना घर आहे, अशा नागरिकांना घरांची आवश्यकता आहे, अशी दिशाभूल करणारी माहिती तयार करून म्हाडा या संस्थेला पाठविण्यात आली असणे; टाऊन प्लॅनिंग मध्ये वेगळे शहर वसविण्याकरिता रेरा कायद्या अंतर्गत कमीत कमी १०० एकर जागेची आवश्यकता आहे परंतु ५५ एकर जागा असताना सुद्धा या प्रकल्पाला मंजुरी मिळाली असणे; सदर योजनेला मंजुरी मिळाल्यानंतर ज्या नागरिकांच्या नावांच्या आधारे मंजुरी मिळवली त्यांना घरे देणे अपेक्षित होते परंतु तसे झाले नसणे; सदरहू योजनेकरिता ज्या नावांची यादी पाठवण्यात आली त्यातील २० लोकांनी सुद्धा यात घर बुकिंग केले नसणे; पतीच्या नावाने घर असताना सुद्धा पत्नीच्या नावाने फ्लॅट बुकिंग केले असून अशा लोकांना प्रधानमंत्री आवास योजने मधून रु.२ लाख ५० हजाराचे अनुदान देणे नियमबाहय असणे; प्रधानमंत्री आवास योजनेचे अनुदान मिळत असल्याने यशोधन विहार प्रकल्पाच्या

मॅनेजमेंट कडून नागरिकांची दिशाभूल करून परिवारातील इतर सदस्यांच्या नावे फ्लॅट घेण्याकरिता प्रोत्साहित करण्यात येत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे; नांदा हा ग्रामीण भाग असल्याने प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना १३०००० + १८००० = १४८०००/- अनुदान मिळते परंतु मागील दोन वर्षात एकाही लाभार्थ्याला प्रधानमंत्री आवास योजनेतून घर मिळाले नसणे; एकीकडे नागरिकांना अनुदान मिळत नाही तर दुसरीकडे बिल्डरच्या फायद्यासाठी म्हाडा योजनेतून डायरेक्ट बिल्डरच्या खात्यात प्रधानमंत्री आवास योजनेचे प्रती लाभार्थी २.५ लाख रुपये अनुदान देण्यात येत असून थेट बिल्डरला अनुदान मिळत असल्याने नागरिकांची फसगत होणे; याप्रकरणी असंख्य तक्रारी असूनही संबंधित शासकीय अधिकारी, विकासक यांचेवर कोणतीही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष; याबाबत शासनाने तातडीची दखल घेऊन फसगत झालेल्या लोकांना न्याय मिळवून देण्याकरिता शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना."

(३) **सर्वश्री. विनोद निकोले, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, राजेश पाटील, श्रीनिवास वनगा, शांताराम मोरे, सुनिल भुसारा, सहसराम कोरोटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय विभागामध्ये राज्यात ०१ लाख २५ हजार बोगस लोकांनी आदिवासी असल्याचे बोगस दाखले जोडून नोकऱ्या मिळवल्या असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास येणे, यासंदर्भात पालघरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर विविध संघटनांच्या मार्फत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मोर्चाचे आयोजन करण्यात येणे, राज्यात बोगस आदिवासींना सेवासंरक्षण देण्याचा, नोकरीत कायम करण्याचा व सर्व आर्थिक लाभ देण्याचा दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी राज्य सरकारने निर्णय घेणे, या विरोधात राज्यातील आदिवासी समाजात तीव्र नाराजी पसरणे, खऱ्या आदिवासींवर अन्याय करणारा शासन निर्णय तात्काळ मागे घेण्याबाबत राज्यात विविध ठिकाणी आंदोलने होणे, बोगस लोकांना सेवा संरक्षण देऊ नका अशी मागणी होणे, खोट्या व बनावट जात प्रमाणपत्रांआधारे आदिवासींच्या नोकऱ्या बळकाविणाऱ्या बोगस आदिवासींवर गुन्हे दाखल करणे व त्यांना अटक करा अशी मूळ आदिवासी बांधवांकडून मागणी होत असणे, त्यांच्याकडून सर्व आर्थिक लाभ वसूल करणे, त्यांना अधिसंख्य पदांना दिलेली

मुदतवाढ थांबवणे, दिनांक ६ जुलै, २०१७ व दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी शासनाने करणे, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग अधिनियम २००० मधील अनुसूचित जमातीसाठी असलेल्या संरक्षण तरतुदींचा भंग करणाऱ्या सचिवांवर कारवाई करणे, अनुसूचित जमातीच्या अवैध प्रमाणपत्र धारकांवर व ते देणाऱ्या अधिकाऱ्यांवर अधिनियम २००० मधील नियम २००३ मधील कलम १० व ११ व नियम १३ च्या तरतुदीनुसार शिक्षा व दंडात्मक कारवाई करणे, आदिवासींची विशेष पदभरती मोहीम सुरू करणे बाबत मागणी होणे, महाराष्ट्र सरकारने दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी घेतलेल्या निर्णय मुळे सुमारे हजारो बोगस आदिवासींना सेवासंरक्षण देण्याचा व नोकरीत कायम करण्याचा हा निर्णय खऱ्या आदिवासींवर अन्याय करणारा असणे यावर शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.सुनिल शेळके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"मावळ तालुक्यामध्ये पवना, जाधववाडी, शिरे-शेटेवाडी, आंद्रा धरण प्रकल्पग्रस्त यांचे पुनर्वसन गेल्या अनेक वर्ष पाठपुरावा करूनही आजपर्यंत झालेले नसून या स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मावळातील पर्यायी जागेच्या उपलब्धतेनुसार करण्याची प्रक्रिया शासन दरबारी सुरू असणे, सदर पुनर्वसनाच्या बाबत अनेकदा शासन दरबारी बैठका होऊनही अद्याप काही ठोस कृती शासनाकडून झालेली नसणे, अशातच बाहेरील प्रकल्पग्रस्तांचे मावळ तालुक्यात मोठ्या प्रमाणात पुनर्वसन होत आहे ही गंभीर स्वरूपाचे बाब निदर्शनास येणे, मूळ स्थानिक प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी उपलब्ध असलेले क्षेत्र आणि खातेदार यांची तुलना करता वाटपासाठी क्षेत्र कमी पडत असून सरकारी गायराने किंवा इतर क्षेत्रांमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, असे असताना तालुक्याबाहेरील लोकांचे मावळात पुनर्वसन केल्याने ७० ते ८० वर्षांपासून पुनर्वसनासाठी प्रतिक्षेत असलेले स्थानिक बाधित खातेदार यावर शासन अन्याय करत असून स्थानिकांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यात यावे या मागणीला शासनाकडून होणाऱ्या अक्षम्य दुर्लक्षामुळे आणि सदर पुनर्वसनासाठी होणाऱ्या विलंबामुळे शासनाविषयी जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असणे, अशातच बाहेरील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मावळ तालुक्यात होऊ नये याकरिता स्थानिक शेतकऱ्यांकडून शासन दरबारी सातत्याने होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली कार्यवाही तसेच तातडीने करावयाची उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

(५) **श्री.राजेश पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील हंगरगा (प.क.) व दापका (गंडोपंत) या दोन गावांच्या ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसेवकाकडून भ्रष्टाचार झाल्या प्रकरणी चौकशी होऊन ग्रामसेवकाला निलंबित करण्यात येणे, संबंधित ग्रामसेवकाच्या निलंबनाच्या कारवाईनंतर जिल्ह्यातील ग्रामसेवक संघटनेने याविरुद्ध आंदोलन करणे, ग्रामसेवक संघटनेच्या या आंदोलनामुळे नांदेड जिल्हापरिषदेच्या उपमुख्य कार्यकरी अधिकाऱ्याने आंदोलन करणाऱ्या ४० ग्रामसेवकाचे निलंबन करणे, राजकीय दबावामुळे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने या ४० ग्रामसेवकाच्या निलंबनाची पुनर चौकशी करण्यासाठी समिती नेमणे, या समितीच्या चौकशी अहवालामध्ये वरिष्ठ व जबाबदार असलेल्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ४० ग्रामसेवकांचा निलंबनाचा निर्णय चुकीचा घेतला असल्याचे सिद्ध होणे, चुकीचा निर्णय घेणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर ग्रामविकास विभागाने कारवाई करणे आवश्यक असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.सुनिल भुसारा, डॉ.किरण लहामटे, श्री.नितीन पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै २०१७ रोजी अनुसूचीत जमाती संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही किंवा ज्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले आहे अशा कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेतून काढून टाकणे आणि कोणताही सेवाविषयक लाभ न देणे असा न्यायनिर्णय असतांनाही शासन मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करत असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आलेले असणे, शासनाने राज्यातील जवळपास विविध विभागात १२८२४ पदांवरील कर्मचारी यांना कायमस्वरूपी सेवेतून काढून टाकणे आणि कोणताही सेवाविषयक लाभ न देणे असा निर्णय असतानाही त्यांना अधिसंख्य दाखवून त्यांना सेवाविषयक लाभ देण्याचा निर्णय घेणे, अनेक शासकीय विभागांनी, अनुदानित विध्यालये, महाविद्यालये, विध्यापिठे, महामंडळे यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही किंवा ज्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले आहे असे कर्मचारी यांची माहिती शासनास सादर न करणे, असे कर्मचारी यांची राज्यातील संख्या जवळपास १२८२४ असतांना फक्त ३५०० पदे दाखवणे, अधिसंख्य पदे निर्माण करून व त्यांना सेवाविषयक

लाभ मंजूर करून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करणे, शासन निर्णय दिनांक १ फेब्रुवारी, २०२० नुसार या १२८२४ पदांवर खरे अनुसूचीत जमाती उमेदवार भरणे आवश्यक असतांना मागील तीन वर्षात फक्त ३५० पदे भरणे, एकंदर शासनाची भूमिका ही आदिवासी विरोधी असल्याचे दिसून येणे, यामुळे राज्यातील आदिवासी समाजात संतापाची लाट पसरणे, खऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना रिक्त असलेल्या १२८२४ जागेवर सामावून घेण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री. शांताराम मोरे, श्रीनिवास वनगा, विश्वनाथ भोईर, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

''औरंगाबाद जिल्ह्यातील वाळुज परिसराला सुनियोजित नागरी सुविधा देण्यासाठी एमआरटीपी अधिनियमांतर्गत सन १९९१ साली सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणुक होणे, सिडकोने सन १९९२ साली विकास योजना तयार करुन अमंलबजावणीस सुरवात करणे, प्रकल्पातील गोलवाडी, तिसगाव, वळदगाव, पंढरपुर व इतर गावातील जमिन संपादनाची कार्यवाही सन १९९६ पासुन सुरु होणे, २६ वर्षाचा कालावधी उलटुनही संपादन कार्यवाही सिडकोमुळे पुर्ण न होणे, सन १९९२ पासुन जमिनी आरक्षण / संपादनाच्या नावाखाली अडकवुन ठेवणे, सिडकोने स्वत:हुन संमतीने निवाडे जाहिर करण्यासाठी भुधारकांबरोबर करारनामे करणे, जमिनी ताब्यात घेऊन त्यावर विकासकामे करणे, २ महीन्याच्या आत निवाडे जाहिर करण्यासाठी मा.उच्च न्यायालायाने दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी आदेश देणे, शासनाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ व दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या पत्राव्दारे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन त्वरीत निवाडे जाहिर करण्याचे निर्देश देणे, सिडकोकडुन जिल्हाधिकारी यांना मोबदल्याची रक्कम जमा न करणे, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची पुर्तता न झाल्यामुळे अवमान याचिका दाखल होणे, मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या निर्देशाचे पुर्नविलोकन करण्याबाबतची सिडकोची याचिका सकारण फेटाळणे, सदर विलंबामुळे मोबदल्याच्या रक्कमेत व्याजाच्या रक्कमेने होणाऱ्या वाढीमुळे सरकारी पैशाचा अपव्य होणे व याची जबाबदारी निश्चित होणे गरजेचे असणे, प्रकल्प परवडत नसल्याच्या कारणाने माहे मार्च, २०२० मध्ये प्रकल्पातुन बाहेर पडण्याचा निर्णय घेणे, प्रकल्पातील प्रलंबित भुसंपादनातुन माघार घेण्याचा निर्णय घेणे, नव्याने भुंपादन न करणे, या घेतलेल्या निर्णयांची २ वर्षापासुन जाणीवपुर्वक अंमलबजावणी न करणे, परिणामी या भागाच्या विकासास अवरोध निर्माण होणे, शासनाने लोकप्रतिनिधी यांनी शासनास केलेले निवेदने विचारात घेऊन त्रयस्थ एजन्सी मार्फत

प्रकल्पाचा आर्थिक व्यव्हार्ता अहवाल ९० दिवसांच्या आत सादर करण्याबाबत दिनांक ४ जून, २०२१ रोजी निर्देश देणे, सदर निर्देश देऊन आज पर्यंत ४६० दिवसांचा कालावधी उलटुन सुध्दा अद्याप अहवाल सादर न होणे, भुधारकांमध्ये शासन, सिडको यांच्या बद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊन शासन, सिडकोची प्रतिमा मलिन होणे, याकरीता सिडकोच्या प्रशासनाची जबाबदारी असणे, त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याची आणि संपादनाच्या फेऱ्यात अडकलेल्या सामान्य जमिन मालकांना त्यांच्या जमिनीच्या विकास कामासाठी तत्काळ परवानगी देण्यासाठी सिडकोला निर्देश देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(८) **श्री.सुनिल कांबळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"पुणे महानगरपालिकेच्या कामकाजाच्याबाबतीत बऱ्याच तक्रारी नागरिकांनी केल्या असणे, सदरच्या तक्रारीवरून स्थानिक लोकप्रतिनिधी माहे डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुणे महानगरपालिका आयुक्तांना पत्र देऊन सदर तक्रारी विषयी विचारणा करून त्याची माहिती मागविलेली असणे, परंतु अद्यापपर्यंत पुणे महानगरपालिकेकडून कोणतीही माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींना उपलब्ध करून दिलेली नसणे, पुणे महानगरपालिकेवर प्रशासकाची नेमणूक झाल्यापासून आजतागायत झालेल्या मुख्यसभा आणि स्थायी सभांमध्ये दाखल करण्यात आलेल्या विषयांना मान्यता देताना अनियमित्तता झाल्याचे आढळून येणे, तसेच पुणे महानगरपालिकेमध्ये प्रशासकाची नेमणूक झाल्यापासून आजतागायत झालेल्या स्थायी समितीमध्ये ज्या निविदा मान्य करण्यात आल्या त्या निविदांमध्ये सहभागी झालेल्या कंत्राटदारांना चुकीच्या पद्धतीने पात्र व अपात्र करणे, 24×7 पाणीपुरवठा योजनेच्या कामाची निविदा मान्य झाल्यापासून आजतागायत मोठ्या प्रमाणात कामे प्रलंबित असणे, जायका (नदी सुधार) प्रकल्पाचे निविदा मान्य झाल्यापासून आजतागायत मोठ्या प्रमाणात कामे प्रलंबित असणे, या सर्व प्रकाराची शासनाने गंभीर दखल घेऊन चौकशी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"मुंबई उपनगरातील पश्चिम द्रुतगती मार्गावर मोठया प्रमाणात होणारी वाहतूक

अप्रकाशित प्रत

कोंडीचे प्रमाण कमी करण्यासाठी मुख्य रस्त्यास लागून ज्या ठिकाणी सेवा रस्ता उपलब्ध करणे शक्य आहे त्या ठिकाणी सेवा रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला असणे, पश्चिम द्रुतगती मार्गावरील ओबेरॉय ते चेकनाका या मार्गावरील सर्वोदयनगर येथे खाजगी ट्रॅव्हस कंपन्यांच्या गाडया बेकायदेशीररित्या उभ्या करण्यात येत असल्याने त्यास बंदी घालून या ठिकाणी असलेल्या बैठया चाळींचे याच परिसरात अन्यत्र पुनर्वसन करून उक्त सेवा रस्त्याचे काम करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून वारंवार मागणी करण्यात येत असणे, जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील गोरेगाव चेकनाका शिवधाम स्मशानभूमी ते वनराई वसाहत येथील प्रस्तावित करण्यात आलेल्या सेवा रस्त्यांचे काम तांत्रिक कारणास्तव तसेच सदरहू प्रस्तावित सेवा रस्त्याच्या वरून उच्चतम विद्युत प्रवाहाच्या व पर्जन्यजल वाहिन्या असल्याने अद्याप प्रलंबित असणे, सद्य:स्थितीत गोरेगाव चेकनाका येथे भुयारी मार्गाचे काम सुरू असल्याने उक्त नमूद प्रस्तावित सेवा रस्त्याच्या खालून उच्चतम विद्युत प्रवाहाच्या वाहिन्या तसेच भूमिगत पर्जन्य जलवाहिन्या स्थलांतरीत करणे सहज शक्य असल्याने त्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत तसेच इस्माईल युसूफ महाविद्यालय बसथांबा ते (रामगड) पंप हाऊस पर्यंतच्या सेवा रस्त्याचे सद्यस्थितीत बंद : असलेले काम तातडीने सुरू करून पूर्ण करण्याबाबत तसेच बिंबीसार नगर ते पंपहाऊस या मार्गावरील सेवा रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.नगरविकास मंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांना माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या सुमारास तसेच त्यानंतरही सातत्याने लेखी निवेदने सादर केलेले असणे, तथापि उक्त निवेदनांच्या अनुषंगाने अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने सदरहू मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक व नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असणे, या प्रकरणी शासनाकडे कार्यवाही करण्याबाबत वारंवार विनंती अर्ज सादर करूनही या प्रकरणी कोणतीच कार्यवाही होत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होणे, उक्त प्रकरणी तातडीने कार्यवाही करून गोरेगाव चेकनाका शिवधाम स्मशानभूमी ते वनराई वसाहत येथील प्रस्तावित करण्यात आलेल्या सेवा रस्त्याचे काम तसेच सदरहू प्रस्तावित सेवा रस्त्याच्या खालून उच्चतम विद्युत प्रवाहाच्या वाहिन्यांचे जाळे व पर्जन्यजलवाहिन्या स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित

(१०) **श्री.सुरेश भोळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"जळगांव शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झालेली असणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना रस्त्यांवर चालणे सुद्धा कठीण झालेले असणे, तसेच शहरातील रस्त्यांवर लहानमोठे अपघात सुद्धा होणे, नागरिक आपला जीव धोक्यात टाकून शहरात

वावरत असणे, तसेच शहरातील अनेक भागातील नागरिकांकडून रस्त्यांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होणे तरीही शासनाचे या तक्रारींकडे दुर्लक्ष होणे, करोडो रुपये खर्च करून सुद्धा रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असणे, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तसेच नवीन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **सर्वश्री. रईस शेख, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अल्पसंख्यांक विकास विभागाच्या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांसाठी मंजूर निधीपैकी मोठ्या प्रमाणात निधी खर्च न झाल्याची बाब दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजी उघड होणे, विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या जवळपास ३१ योजनांपैकी अनेक योजनांमध्ये लाभार्थ्यांना योग्य लाभ न देण्यात येणे, अल्पसंख्यांक विभागाच्या अधिपत्याखालील १) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी २) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ ३) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी ४) महाराष्ट्र राज्य हज समिती ५) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग ६) महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण ७) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ व ८) खुद्द मंत्रालय या कार्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने योजना राबवण्यासाठी विभाग सक्षम नसणे, बऱ्याच कार्यालयांमध्ये योजनांच्या अंमलबजावणी मनुष्यबळाअभावी लाभार्थी निवड न होणे, तसेच शासनाच्या विविध विभागांशी वेळेत समन्वय साधु न शकणे परिणामी मागणी अभावी काही योजनांकरीताच 0% निधी खर्च होणे, याबाबत सभागृहात दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी लक्षवेधी सूचना उपस्थित केली असता मंत्र्यांनी त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन देणे,मात्र आजपर्यंत कोणतीही समिती तथा बोर्डाची गठन व त्या विषयी बैठक न होणे तसेच महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी अभ्यासगट स्थापन करून सविस्तर पाहणी अहवाल सादर करण्यासाठी TISS या संस्थेची नियुक्ती करूनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न होणे, या विषयी शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे अल्पसंख्याक समाजात पसरलेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) श्री.राम सातपुते, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उपमुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"दिनांक १४ एप्रिल, २०२२ व त्या सुमारास पंजाब येथून आलेला कमल सिंघ व त्याचा सोबत असलेले काही सहकारी यांनी नगर जिल्ह्यातील गावागावात जाऊन लोकांना पैशाचे खोटे आमिष दाखवून अनधिकृतरित्या धर्मांतरण करणे, सदर बाब उघडकीस आली असून राहुरी येथील प्रगती विद्यालय आणि ब्राम्हणी येथे मोठ्या प्रमाणात स्थानिक लोकांचे धर्मांतर करून श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे पुढील कार्यक्रम नियोजित केलेला असणे, तसेच याबाबत अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी पोलीस स्टेशन येथे अनधिकृत धर्मातरासंदर्भात विविध संघटनाच्या पाठपुराव्यामुळे दिनांक १५ एप्रिल, २०२२ रोजी व त्या सुमारास श्रीमती मीराबाई सुभाष हरेल यांनी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल करणे, तसेच अद्याप पोलीस विभागाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, तसेच संबंधित आरोपी कमल सिंघ यांनी अहमदनगर जिल्ह्यात धर्मांतरासाठी अनधिकृतरित्या मोठ्या प्रमाणात पैसे आणून पास्टर कमल सिंघ यांच्याविरुध्द जो आवाज उठवेल त्याचाविरुद्ध कमलसिंघ यांच्या माणसाकडून आणि स्थानिक पोलिसांकडून 'atrocity' गुन्हा दाखल करण्याची धमकी स्थानिक नागरिकांना दिली जात असणे, यासंदर्भात आरोपीला पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी पाठीशी घालणे व राजकीय दबाव असल्याने कार्यवाही करू शकत नाही असे पोलीस निरीक्षक यांनी सांगणे,तसेच राहुरी पोलीस स्टेशनचे प्रभारी आणि तपास अधिकारी यांनी आरोपी कमल सिंघ यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पैसे घेतलेले असून पोलीस स्टेशनचे प्रभारी यांची व त्यांच्या नातेवाईकांची प्रॉपर्टीची चौकशी करणे, असल्यास, आत्तापर्यंत शासनाने पोलिसांविरुद्ध व दोषींविरुद्ध काय कारवाही केली अथवा करण्यात येत आहे ? आणि या गून्ह्या संदर्भात उच्चस्तरीय चौकशी होणार का ? याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाही व प्रतिक्रिया."

**(१३) श्री.रवि राणा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्य सरकारने राज्यांमध्ये पिण्याचे पाणी आणि शेतीला सिंचनासाठी पाणी मिळण्यासाठी मोठे प्रकल्प हाती घेऊन सर्व नागरिकांना पिण्याचे पाणी, शेतकऱ्यांना सिंचनाचे पाणी मिळण्यासाठी मोठ्या योजना हाती घेतल्या असणे, असे असताना मौजे परसोडा, मसोद तालुका अमरावती येथे निलेश चौरसिया यांनी स्टोन इंडस्ट्रीज परसोडा येथील गट नंबर ४३, २० व १२ मध्ये विनापरवाना अग्रीम स्वामीत्वधनाचा भरणा न करता

गौण खनिजाची अवैध साठवणूक व स्फोटक रासायनिक पदार्थ जिलेटिन कांड्या वापरून बोअर ब्लास्टिंग करून ज्या मुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या घरांना तडे गेलेले असणे, त्यांच्या शेतामध्ये असलेल्या विहिरीचे पाणी आटणे या बाबतीत शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०२२ च्या दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयात सदर स्टोन इंडस्ट्रीज हे बंद करून बोअर स्फोटक ब्लस्टिंग बंद करून व त्या मालकांनी गौण खनिज माल अवैध साठवणूक केली त्याची चौकशी करून या संबंधाने शेतकऱ्यांनी शेतमजुरांची मागणी केली असणे, सदर खदान मालक विरुध्द जिल्हाधिकारी कार्यालयाचे यंत्रणा, पोलीस विभाग यंत्रणा यांनी संयुक्त रित्या धाड टाकून तेथील मुद्देमाल पाहणी दरम्यान आढळुन आल्याने संबंधित खदान मालक यांच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयाने रिपोर्ट देऊन पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असणे, दंड ठोठावला असणे परंतु सदर खदान मालक हा शासकीय यंत्रणेच्या प्रमुखांना न जुमानता त्यांनी आपला धंदा सर्रासपणे सुरू असणे, यावर शासनाने तातडीने लक्ष घालण्याची गरज असणे जेणेकरून शेतकरी शेतमजूर यांना या प्रकरणी न्याय मिळवून देण्यासाठी आमरण उपोषणाचा इशारा दिलेला असणे, सदरची बाब गंभीर असणे, या संबंधाने शासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१४) **श्री.रोहित पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"कर्जत तालुका जिल्हा अहमदनगर येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याच्या दृष्टीने मोजे पाटेगाव व खंडाळा येथील सहाशे वीस हेक्टर क्षेत्राची सह मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन यांचे अध्यक्षतेखाली भूमी निवड समिती मार्फत दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी स्थळ पाहणी करण्यात आलेली असणे प्रादेशिक अधिकारी नाशिक यांनी दिनांक १५ मार्च, २०२२ च्या पत्रांवर स्थळ पाहणे अंतिम भू निवड समितीने दिलेल्या सूचनेनुसार ड्रोन सर्वे करून नकाशा नुसार क्षेत्र प्रस्तावित करणे तत्कालीन मंत्री यांच्या साप्ताहिक आढावा व विशेष आढावा बैठकीत सदर प्रस्तावास प्रकरण ६ व खंड (२) तरतुदी लागू करण्यास औद्योगिक विकास मंडळाने प्रस्तावित करणे, त्या अनुषंगाने कर्जत येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यास उच्च अधिकार समितीने तत्वतः मान्यता देणे, तथापि अद्यापही सदर औद्योगिक क्षेत्राची अधिसूचना विभागामार्फत पारित न होणे, परिणामी महाराष्ट्र राज्यात उद्योग येण्यास इच्छुक असताना त्यांना औद्योगिक क्षेत्र उपलब्ध न होणे, स्थानिक नागरिकांना रोजगार न उपलब्ध होणे, परिणामी कर्जत व जामखेड तालुक्यासह जिल्ह्यात नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, कर्जत औद्योगिक क्षेत्राची अधिसूचना होऊन उद्योग स्थापन होण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित

(१५) **कॅप्टन आर. सेल्वन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील सायन कोळीवाडा विधानसभा क्षेत्रात ७५ टक्के पेक्षा अधिक भाग हा झोपडपट्टीने व्यापलेली असून यामधील बहुतांश झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प हे मागील १५ ते २० वर्षापासून प्रलंबित असणे, सदर ठिकाणी विकासकाने झोपू प्रकल्प राबविण्याकरिता झोपड्यांचे निष्कासन केले असणे, तद्‌नंतर सदर झोपडीधारकांना वेळेवर घरभाडे विकासकाकडून मिळत नसणे, याबाबत एस.आर.ए. प्राधिकरणाकडे वारंवार तक्रार करूनही १० ते १२ वर्षे भाडे थकीत असलेल्या विकासकांवर कोणतीच कारवाई करण्यात न येणे, विकासक वारंवार उच्च स्तरीय समितीकडे सुनावणी करीता अर्ज करीत असल्यामुळे सदर प्रकल्प रखडलेले असून परिणामी प्रकल्पबाधितांना त्याचा भुर्दंड सोसावा लागत असणे, परिणामी शासनाप्रती नागरिकांमध्ये मोठ्याप्रमाणात पसरत असलेली असंतोषाची भावना, अशा प्रकारे प्रकल्प उभारणी मध्ये दिरंगाई करणाऱ्या विकासकांवर शासनाने कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, झोपू प्रकल्पांमध्ये सदनिका प्राप्त झाल्यानंतर काही अपरिहार्य कारणास्तव सदनिका-धारकाला सदर सदनिकेची विक्री करावयाची असल्यास त्यासाठी १० वर्ष वाट पाहवी लागत असणे, सदर योजनेतील सदनिका विक्री करण्यासाठीची कालमर्यादा कमी करण्याची मागणी सदनिका धारकांकडून होत असणे, मुंबईतील वनक्षेत्र व मिठागरांवर वसलेल्या झोपडपट्यांचा समावेश झोपू योजनेत करण्यासाठी शासनाने भूमिका घेण्याची आवश्यकता, काही झोपू प्रकल्पांतील भूखंड हे केंद्र शासनाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे संबंधित विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याने याबाबत राज्य शासनाने पुढाकार घेवून सदर रखडलेले ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यास सुलभता आणण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १०४ ते १२४ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(क) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री :** महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम-६ (१) नुसार सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(ख) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री :** मुंबई विद्यापीठ यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग) वैद्यकीय शिक्षण मंत्री :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२१ या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल व सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(घ) कामगार मंत्री :**

(१) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सन २००४-२००५ ते सन २०१३-२०१४ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१९-२०२० या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) रत्नागिरी-सिंधुदूर्ग जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१७-२०१८ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

(४) पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(५) नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सोळावा व सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(६) औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा २०१९-२०२० या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(७) नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(८) अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(९) कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(१०) माल वाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक पन्नासावा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

(११) दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(१२) दि खोका मेकींग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(१३) सातारा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, यांचे सन २०१४-२०१५ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(१४) सांगली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, यांचे सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे बत्तीसावा, तेहतीसावा,चौतीसावा, पस्तीसावा, छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(१५) इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, इचलकरंजी यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(१६) नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, (लासलगांव) यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे एकतीसावा व बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

(१७) नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे पस्तीसावा व छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(१८) परभणी-हिंगोली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, परभणी यांचे सन २००९-२०१० ते २०१६-२०१७ या वर्षांचे सहावा, सातवा, आठवा, नववा, दहावा, अकरावा, बारावा, तेरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(१९) बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चोवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२०) नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२१) जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचे सन २०१८-२०१९ ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे तीसावा, एकतीसावा, बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२२) मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

असुधारीत प्रत

(२३) महाराष्ट्र मच्छिमारी उद्योगातील मच्छिमार आणि इतर कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सहावा व सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२४) पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ यांचे सन २००५-२००६ ते २०१६-२०१७ या वर्षांचे अनुक्रमे सव्वीसावा, सत्तावीसावा, अठ्ठावीसावा, एकोणतीसावा, तीसावा, एकतीसावा, बत्तीसावा, तेहतीसावा, चौतीसावा, पस्तीसावा, छत्तीसावा, सदोतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२५) पिंपरी-चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१८-२०१९ ते २०१९-२०२० या वर्षाचे अनुक्रमे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२६) अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२७) औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, औरंगाबाद यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२८) जळगाव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

(२९) धुळे व नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचे सन २०१७-२०१८ ते २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे एकोणतीसावा, तीसावा, एकतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३०) लातूर आणि उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लातूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३१) क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३२) नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ) कृषि मंत्री** : (१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचे वार्षिक लेखे व वार्षिक लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

अप्रधारीत प्रत

(३) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे सन २०१३-२०१४ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(च) महिला व बालविकास मंत्री** : महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचा अनुक्रमे सव्वीसावा व सत्तावीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री.हिरामण खोसकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असल्याने या ठिकाणी दररोज हजारो भाविक दर्शनासाठी व धार्मिक विधीसाठी येत असून इगतपुरी मध्ये जागतिक विपश्याना केंद्र असल्याने ध्यानधारणा करण्याकरिता देशविदेशातून मोठया प्रमाणात पर्यटकांची गर्दी होणे, पर्यटन व धार्मिक देवस्थान असल्याने नाशिक जिल्हयात मूलभूत सुविधा तातडीने पुरविणे आवश्यक असतांना शहराचा विकास करतांना स्थानिक रहिवाशांना व लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेणे, त्र्यंबकेश्वर शहराचा विकास करण्याकरिता निधी मिळूनही वेळेत कामे न झाल्यामुळे हा निधी अखर्चित राहणे, त्यामुळे विकास कामांना अडचणी निर्माण होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, यांस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(२) **श्री.प्रकाश सुर्वे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"बोरिवली येथे ( मुंबई उपनगर ) कार्यरत असलेले नगर भूमापन अधिकारी हे भ्रष्ट

अप्रकाशित प्रत

अधिकारी असून कुठलेही काम करावयाचे असल्यास नेहमीच मोठया रक्कमेची मागणी करणे, पैसे न दिल्यास ते जनतेची कामे न करणे, तसेच जनसामान्यांशी नेहमीच उध्दटपणे वर्तन करणे, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या सुमारास लेखी निवदेनाद्वारे तक्रार केली असता अमुस (गृह) व प्र.स.(न.वि.२) यांना तात्काळ सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे दिलेले निर्देश, असे असतांनाही यासंदर्भात कोणतीच कारवाई न करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(३) **श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील बोरिवली (पूर्व) येथील नूतन नगर, नेहरूनगर, संतोष नगर, दौलत नगर व दहिसर (प) येथील इंदिरानगर या वस्तीत सुमारे ११११ झोपडीधारक गेल्या ३५ ते ४० वर्षापासून राहत असणे, या झोपडी धारकांकडे १९९५ चे ओळखपत्र, रेशन कार्ड, विज बिल, फोटो पास आणि सेन्सेस सर्टिफिकेट इत्यादी सर्व कायदेशीर पुरावे असणे, परंतु या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनाकडून झोपडी निष्काषित करण्याची वारंवार नोटीस बजाविण्यात येणे, झोपडी धारकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी रेल्वे कार्यालय, मुंबई सेंट्रल येथे बोलविण्यात येणे व त्यावेळी त्यांच्याकडून आवश्यक पुरावे सादर करण्यात येणे, या झोपडीधारकांवर रेल्वे प्रशासनाकडून होणारी कारवाई स्थगित करण्याची होत असलेली मागणी, यासाठी रेल्वे प्रशासनाकडे राज्य शासनाने करावयाची शिफारस, संबंधित झोपडीधारकांचे एमएमआरडीएच्या माध्यमातून पुनर्वसन करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"राज्यात सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील दक्षिण सोलापूर मध्ये अवैध कत्तलखाने असल्याचे उघड होणे सदर कत्तलखान्यात बांग्लादेशी घुसखोर असल्याची धक्कादायक बाब माहे नोव्हेंबर, २०२२ समोर येणे अनधिकृत कत्तलखाने असल्याने तेथील स्थानिक नागरिकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने स्थानिक प्रशासन सदर प्रकरणाबाबत गंभीर नसल्याचे दिसून येणे तक्रार असून ही कोणतीही कारवाई होत नसून स्थानिक प्रशासन कोणतीही कारवाई करत नसल्याचे

अप्रकाशित

दिसून येणे, त्यामुळे, सदर प्रकरणी स्थानिक प्रशासनावर प्रचंड दबाव असल्याची शक्यता निर्माण होणे, सदर प्रकरणी कोणाचा दबाव आहे हे शोधून काढण्याची गरज असणे, सदर अवैध कत्तल खान्यामुळे स्थानिक ठिकाणी रोगराई पसरत असून तेथे पाणी प्रदूषण होऊन वेगवेगळे आजार पसरत असल्याची बाब समोर येणे, त्या ठिकाणी बांग्लादेशी घुसघोर असल्याची बाब समोर आल्याने सुरक्षतेचे प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे, तेथे या संबंधात प्रतिकात्मक उपाय योजना करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"विदर्भात "वैनगंगा ते नळगंगा" हा एकमेव नदी जोड प्रकल्प प्रस्थावित असणे, या प्रकल्पाचा नॅशनल वाटर डेव्हलपमेंट एजन्सी (NWDA) कडून प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असणे, या प्रकल्प अहवालानुसार वैनगंगा नदीचे अतिरिक्त पुराचे पाणी, नागपूर-वर्धा अमरावती-अकोला-नळगंगा (ता.मोताळा जि.बुलडाणा) या मार्गावरील कमीत कमी ४० धरण साठ्यात आपआपल्या कॅचमेट एरियाला सरप्लस म्हणुन, पाणी उपलब्ध करून येण्याची योजना असणे, ज्याव्दारे एखाद्या वर्षी पाऊस कमी पडला तरीही, जलसाठे १००% पूर्ण क्षमतेणे भरलेले राहतील असे असले तरीही विदर्भातील या एकमेव नदीजोड प्रकल्पातून पश्चिम विदर्भातील ४०% च भूभागाला फायदा होणे, परंतु प्रकर्षाने आवश्यक असलेल्या घाटमाथ्यावरील बुलडाणा-वाशीम यवतमाळ-चंद्रपूर इत्यादी चा ६०% भूभाग या प्रकल्पापासून वंचित राहणे, पश्चिम विदर्भातील हि वास्तव उणीव भरून काढण्याकरिता, या नदीजोड प्रकल्पामध्ये खामगाव जिल्हा बुलढाणा ते घाटमाथ्यावरील मन व पैनगंगा नदी पुन्हा जीवित करण्यासाठी ४७ किमी च्या प्रकल्पाचा विस्तार करण्याची आवश्यकता, यामुळे या नदीजोड प्रकल्पाच्या संभावित मार्गावरील भंडारा-नागपूर-वर्धा अमरावती-अकोला-बुलढाणा घाटमाथ्यावरील बुलढाणा-वाशीम यवतमाळ-चंद्रपूर हे सर्व जिल्हे कायम स्वरूपी सुजलाम सुफलाम होणे, अश्या या नदीजोड प्रकल्पामुळे संपूर्ण विदर्भात पाणी प्रदक्षिणा घेऊन पैनगंगा नदीमार्गे, विदर्भ संपता संपता आणि तेलंगना राज्य लागण्या अगोदर पुनच्छ वैनगंगा नदीपात्रात पाणी पोहचेल, संपूर्ण विदर्भाला प्रदक्षिणा घालणारी हि जलवाहिनी उद्याच्या विदर्भाचे उज्वळ भविष्य असणे, याकरिता बुलडाणा जिल्ह्यातील घाट मन आणि पैनगंगा नदीत पाणी सोडण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

(६) **श्री.अजय चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"मुंबईतील परळ शिवडी विभागातील प्लॉट नं.२०२ (पी.टी.) २४०, ४१६, ४१७ (पी.टी.) या भूखंडावर करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम, संबंधित विकासकाने उक्त भुखंडावर भव्य सुप्रिम टॉवर आणि भव्य सुप्रिम एनएक्स अशा दोन गगनचुंबी इमारतीचे बांधकाम करणे, सदर बांधकाम करतांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने २२ मजल्याची मंजूरी दिलेली असतांनाही १४ मजल्याचे बांधकाम करणे, तद्नंतर इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरही नियमबाह्य पध्दतीने सन २०२१ मध्ये सुधारीत आराखडे एसआरएला सादर करण्यात येणे, सदर आराखडा सादर करतांना वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांनाही ते न घेणे, एका इमारतीच्या बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेला फंजीबल एफएसआय हा विकासकाने एसआरएची कोणतीही परवानगी न घेता मनमानी पध्दतीने दुसऱ्या इमारतीला वापरणे, विकास नियंत्रण नियमावलीनुसार सदर इमारतीमध्ये २५ टक्के व्हीजीटर पार्किंग राखीव ठेवणे आवश्यक असतांनाही विकासकाने पार्किग न ठेवणे, त्याच प्रमाणे इमारतीच्या पोडीयममध्ये विकासकाने स्वतःच्या व्यावसायीक कामाकरीता अनधिकृतपणे कार्यालयाचे बांधकाम करणे, सदर प्रकल्पातील उपकरप्राप्त बांधकामासंदर्भात म्हाडा प्राधिकरणाकडून ना-हरकता प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांनाही कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र न घेता पुनर्विकास प्रकल्प राबविणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व विकासकाला दिलेल्या सर्व परवानग्या रद्द करण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये एसआरएकडे केलेली असणे, शासनाने यासर्व प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन संबंधित विकासकावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(७) **डॉ.राजेंद्र शिंगणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"बुलढाणा जिल्हयातील लोणार येथील तहसिलदार यांनी सर्वे नं.१५/२ मधील पिंपळखुटा रोडवर असलेल्या पुरातन १३ व्या व १४ व्या शतकातील सोमतिर्थ बारव तथा

अप्रकाशित प्रत

पुरातन थडगे असलेली जमीन या प्रयोजनासाठी असलेल्या इंग्रजकालीन अकृषक पोटखराब दाखवून व आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन अकृषिक क्षेत्रात बदल करणे व तशी नोंद ७/१२ वरुन काढून टाकलेली असणे, सदर नोंद ७/१२ वरुन हटविल्यामुळे जमिन मालकाशी संगनमत करुन त्या जागेवर जमिन मालकाने प्लॉट पाडून केलेली अवैध विक्री हे चुकीचे फेरफार करणाऱ्या तहसिलदाराविरुध्द तेथील लोकप्रतिनिधी व नागरीकांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजी केलेली तक्रार, लोणार तालुक्यात वाळू व मुरुम याची मोठया प्रमाणात गैरमार्गाने उपसा होत असून सुध्दा तहसिलदारांचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष तसेच या तहसिलदाराविरुध्द यापूर्वी सुध्दा बऱ्याच तक्रारी करण्यात आलेल्या असून सुध्दा त्यावर कोणतीच कारवाई करण्यात येत नसल्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, तहसिलदार, लोणार यांची त्वरीत बदली करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री.दत्तात्रय भरणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"इंदापूर (जि. पुणे) येथील तसेच राज्यात पुणे, अहमदनगर, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, सातारा व औरंगाबाद या सात जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र शेती महामंडळाच्या एकूण १४ मळ्यावर हजारो कामगारांपैकी ८०% कामगार अनुसूचित जाती/जमाती, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय प्रवर्गातील असणे, हे कामगार कच्च्या घरांमध्ये व झोपड्यांमध्ये राहत असून या घरांची अवस्था अत्यंत दयनीय असणे, त्यांच्या राहत्या घरांची पडझड झाल्याने त्यांचे संसार उघड्यावर आले असून हे कामगार आपला जीव धोक्यात घालून त्याच पडक्या घरात राहून संसाराचा गाडा चालवत असणे, शासनाच्या माध्यमातून त्यांना इंदिरा आवास घरकुल योजनेतून घरेही मंजूर झाली असून त्यांच्याकडे घर बांधण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा उपलब्ध नसल्याने अनेकांना घरकुल मंजूर असूनही स्वतःच्या मालकीची जागा उपलब्ध नसल्याने अनेकांना घरकूल मंजूर असूनही जागेअभावी शासनाच्या घरकुल योजनेपासून वंचित राहावे लागत असणे, याबाबत शेती महामंडळाच्या राज्यातील कामगारांनी निवृत्त व रोजंदार कामगार कामावर असलेले व मयत कामगारांचे वारसदार यांना राहण्यासाठी शेती महामंडळाकडे शिल्लक असलेल्या जमिनीपैकी दोन गुंठे जागा देऊन पंतप्रधान घरकुल योजनेच्या माध्यमातून घर बांधून मिळणेबाबत वेळोवेळी मागणी, मोर्चे, आंदोलने करुनदेखील अद्यापही त्यांना राहण्यासाठी दोन गुंठे जागा न मिळणे, त्या कामगारांच्या प्रश्नावर तत्कालीन महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ मे, १९९८ रोजी ना. रामराजे निंबाळकर समिती नेमलेली असणे, या समितीने कामगारांना जमिन व घर देण्यासाठी सकारात्मक शिफारशी केलेल्या असणे, या शिफारशी शासनाने स्वीकारण्याबाबत व या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत या

कामगारांनी मागणी केलेली असणे, त्यामुळे महाराष्ट्र शेती महामंडळाच्या १४ मळ्यांमधील हजारो कामगारांना घर बांधण्यासाठी शेती महामंडळाकडे शिल्लक असलेल्या जमिनीपैकी २ गुंठे जमिनी देण्याची व ना. रामराजे निंबाळकर समितीच्या शिफारशी स्वीकारुन या कामगारांना न्याय देण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **डॉ.देवराव होळी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"तेलंगना महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा येथे गोदावरी नदीवर मेडीगट्टा कालेश्वरम सिंचन प्रकल्प दोन्ही राज्याच्या संयुक्त संमतीने कार्यान्वित असणे, दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी मुंबई येथे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस व तेलंगाना चे मुख्यमंत्री मा.के.चंद्रशेखर राव यांच्या स्वाक्षरीने झालेल्या संयुक्त करारनाम्यानुसार ३७८ हेक्टर आर जमिनीचे भूसंपादन करणे अपेक्षित असणे, मात्र अजूनही १७६ हेक्टरचे भूसंपादन करण्यात न येणे, त्यातच ज्या जमिनीचे भूसंपादन मंजूर करण्यात आले त्या मंजूर झालेल्या भूसंपादनाची प्रक्रिया अजून पर्यंत पूर्ण न होणे, जमीनही गेली उत्पादनही गेले, मोबदलाही मिळालेला नाही त्यामुळे आता शिल्लक काहीच राहिलेले नसल्याने शेतकरी प्रचंड संकटात सापडलेला असणे, त्यातच या प्रकल्पातून वारंवार पाणी सोडत असल्यामुळे या प्रकल्पाचे पाणी सोडताना निर्माण होणाऱ्या अतीप्रवाहामुळे नडीकुडा, कोत्तुर, चितारवेला, रंगधामपेठा, अंकिसा, यासह अनेक गावातील शेकडो हेक्टर जमीन दरवर्षी वाहत जाऊन त्या जमिनीचे नदीत रूपांतर होणे, त्याचे प्रचंड नुकसान शेतकऱ्यांना होत असून अनेक शेतकरी भूमीहीन झाले तर अनेक शेतकरी भूमी होण्याच्या मार्गावर असणे, याप्रकारे दरवर्षी जमीन नदीमध्ये रूपांतरित होत असल्याने या नदीकाठावर संरक्षण भिंत बांधण्याची आवश्यकता निर्माण होणे, त्यामुळे ज्या शेतजमिनी भूसंपादना अंतर्गत मंजूर झालेल्या आहेत त्या शेतजमिनीची तात्काळ भूसंपादन प्रक्रिया करून हेक्टरी ५० लक्ष रुपये मोबदला देण्याची आवश्यकता निर्माण होणे, याकरिता मागील अनेक वर्षांपासून पीडित शेतकरी सातत्याने याबाबतच्या मागण्या शासन स्तरावर करूनही अजून पर्यंत त्या मागण्यांचा विचार न होणे, या विरोधात करण्यात येत असलेले उपोषण, आंदोलन याची दखल घेऊन शासनाने या मागण्यांचा विचार करण्याची आवश्यकता, दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी संयुक्त स्वाक्षरीने केलेल्या करारनाम्यातील बाबींची पूर्तता करण्याची नितांत आवश्यकता असणे, ज्या जमिनीचे भूसंपादन अजूनपर्यंत करण्यात आलेले नाही त्या जमिनीचे तातडीने भूसंपादन करून हेक्टरी ५० लक्ष रुपये मोबदला देण्याची कारवाई सुरू करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **श्री.समाधान आवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"माहे नोव्हेंबर, २०२२ व त्या सुमारास "शालेय पोषण आहार योजने अंतर्गत" सोलापूर जिल्हा सहित संपूर्ण राज्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याची बाब उघडकीस येणे, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना पोषण युक्त आहार मिळावे याकरता सदरची योजना सन २००९ मध्ये शासनामार्फत चालू करण्यात येणे, सदरची योजना मागील १३ वर्षापासून पूर्ण राज्यात चालू असणे, परंतु जिल्हास्तरावर निविदा काढताना अनेक वेळेस संबंधित अधिकाऱ्यांमार्फत ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे शासन नियमाचे पालन न करता ठेकेदाराच्या अटी शर्तीनुसार निविदा काढण्यात येत असणे, सदर निविदा काढताना निविदेमध्ये एक दिवस अगोदरच नियमबाह्य धान्याचे नमुने मागवून त्याप्रमाणे ठेकेदार सामूहिक रित्या निविदेचे दर भरत असणे, निविदा भरताना दाखवण्यात येणाऱ्या धान्याचे नमुने व प्रत्यक्षात पुरवठा करण्यात येत असलेल्या धान्यात खूप मोठी तफावत असणे, बहुतांश वेळ सदर ठेकेदारांमार्फत योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणारे चांगले प्रतीचे धान्य खुल्या बाजारात विकून त्याऐवजी भेसळयुक्त अन्नधान्य शाळांना पुरविण्यात येत असणे, तसेच शासनाने निश्चित केलेल्या धान्यांच्या दरापेक्षा अधिक किमतीत धान्य खरेदी करणे, उदाहरणार्थ मागील वर्षभरात शासनाने सर्व जिल्हास्तरावर चणाडाळ व मुगडाळ मोठ्या प्रमाणात वाटप केला असून सरकारी यंत्रणेकडे चणाडाळ रुपये ५२ प्रति किलो, तुरडाळ रुपये ६० रुपये प्रति किलो व मुगडाळ रुपये ५८ प्रति किलो या दरात उपलब्ध असताना देखील जाणून-बुजून ठेकेदारांमार्फत शालेय पोषण आहारामध्ये धान्य पुरविताना चणा रुपये ७८ प्रति किलो, मुगडाळ रुपये ९५ प्रति किलो, व तूरडाळ रुपये १०५ प्रति किलो या दराने विकत घेण्यात येणे, यामध्ये शासनाच्या पैशाचा मोठ्या प्रमाणात अपहार होत असल्याचे निदर्शनास येणे, अनेक वेळेस जिल्हास्तरावर निघालेल्या निविदेमध्ये ज्या जिल्ह्यामध्ये तीन पेक्षा कमी निविदा आल्या आहेत त्या ठिकाणी शासन नियमानुसार हे निविदा काढणे आवश्यक असताना संबंधित अधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून बाजूच्या जिल्ह्यातील ठेकेदारालाच सदरचे काम देत असल्याचे निदर्शनास येणे, या सर्व अवैध प्रकाराला आळा बसावा याकरता प्रत्यक्षात ठेकेदारांना सदरचे काम देण्याऐवजी गरजू महिला बचत गटांना सदरचे काम देण्यासंदर्भातची मागणी सामाजिक संस्थेमार्फत वारंवार करण्यात येणे, तसेच सर्व धान्य खरेदी शासनाच्या नाफेड किंवा दि. महाराष्ट्र स्टेट को ऑफ मार्केटिंग फेडरेशन यांचेकडून करण्याची आवश्यकता असणे, शासनाच्या योजनेचा गैरवापर करून स्वत:चे खिसे भरणारे अधिकारी व ठेकेदार हे दोघे संगनमताने करत असलेल्या भ्रष्टाचारामुळे भविष्यात विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होणार असणे, याबाबत संबंधित ठेकेदार व अधिकारी यांचे विरुद्ध सर्वसामान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष पसरलेला असणे, यावर उपाय म्हणून शासनाने तातडीने उच्चस्तरीय समिती नेमून होत असलेला व झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर ताबडतोब करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : शासकीय विधेयके :**

**पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२.

**सहा : मा.उद्योग मंत्री यांचा म.वि.स नियम ११० अन्वये शासकीय ठराव :-**

**ज्याअर्थी,** नागरी विमानचालन महासंचालक, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी, स्थायी आदेश क्रमांक ७२७ (ई), दिनांक ४ ऑक्टोबर, १९९४ व्दारे प्रदान केलेल्या, वायुयान अधिनियम, १९३४ (१९३४ चा २२) या अन्वये तयार केलेल्या वायुयान नियम, १९३७ याच्या नियम ७८ खालील अधिकारांचा वापर करुन, सिंधुदुर्ग विमानतळ, सिंधुदुर्ग याकरिता, आयआरबी सिंधुदुर्ग एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड यास 'विमानतळ लायसन-सार्वजनिक हितार्थ वापरार्थ' दिले आहे;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग येथील उक्त विमानतळाला "बॅ.नाथ पै.विमानतळ सिंधुदुर्ग" असे नाव देणे इष्ट आहे आणि त्या प्रयोजनार्थ राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर, असा प्रस्ताव, भारत सरकारच्या नागरी विमानचालन मंत्रालयाकडे पाठवणे आवश्यक आहे;

**त्याअर्थी आता,** महाराष्ट्र विधानसभा नियमांच्या नियम ११० नुसार, महाराष्ट्र विधानसभा याव्दारे, सिंधुदुर्ग येथील उक्त विमानतळाला "बॅ. नाथ पै. विमानतळ, सिंधुदुर्ग" असे नाव देण्याची शिफारस भारत सरकारला करते.

**(गुरूवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : सर्वश्री अजित पवार, अजय चौधरी, अनिल पाटील, अमित देशमुख, अमित झनक, अशोकराव चव्हाण, आदित्य ठाकरे, इंद्रनिल नाईक, कैलास गोरंट्याल, चंद्रकांत नवघरे, छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. जितेश अंतापूरकर, दिलीप वळसे-पाटील, देवेंद्र भुयार, धर्मरावबाबा आत्राम, धिरज देशमुख, नानाभाऊ पटोले,**

**डॉ. नितिन राऊत, सर्वश्री नितीनकुमार देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, प्रकाश सोळंके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री बळवंत वानखडे, बाबासाहेब पाटील, बाळासाहेब आजबे, भास्कर जाधव, मनोहर चंद्रिकापूरे, मोहनराव हंबर्डे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री रणजीत कांबळे, रविंद्र वायकर, राजु पारवे, राजू कारेमोरे, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री राजेश टोपे, राजेश एकडे, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री विकास ठाकरे, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, विनोद निकोले, संजय बनसोडे, संदिप क्षिरसागर, सहसराम कोरोटे, सुनिल केदार, सुनिल प्रभू, सुभाष धोटे, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अबू आजमी, रईस शेख, धनंजय मुंडे, माधवराव पाटील-जवळगावकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागाचा झपाट्याने विकास होण्याच्या दृष्टीने योजनांच्या अंमलबजावणीत सातत्य दाखविण्याची नितांत आवश्यकता असणे, विदर्भातील मुख्य फळपीक असलेल्या संत्रा पिकासाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्याच्या निर्णयाची, मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता "सायट्रस इस्टेट" स्थापन करण्याच्या निर्णयाची आवश्यकता, औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र निर्माण करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असणे, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस व सोयाबीन मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेची धडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, तसेच, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील पिकांचे, विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग या पिकांचे तसेच संत्री, मोसंबी, डाळींब, द्राक्ष या फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केलेले असणे, त्याऐवजी तुटपुंजी मदत जाहीर करुन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदतही अद्याप मिळालेली नसणे, सरकारच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारले असणे, विदर्भात कापसावर लाल्या रोगाचा व संत्र्यांवर कोळश्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असणे, राज्य व केंद्र सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे व मदतीचा हात आखडता घेतल्याने माहे जुलै, २०२२ पासून ६ महिन्यांच्या काळात सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली असणे, विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यात सहा दिवसांत सात युवा शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असणे, "शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करु", ही सरकारची घोषणा हवेत विरली असणे, सन २०१५ ला २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एनडीआरएफचे निकष निश्चित केले असताना व २०२१ ला निकषात वाढ अपेक्षित असताना २ वर्षांचा

अप्रकाशित

काळ उलटून गेल्यानंतरही केंद्र सरकारने निकषात वाढ केली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना एनडीआरएफ व एसडीआरएफमधून तुटपुंजी मदत मिळत असणे, बांगलादेश सरकारने आयात शुल्कात वाढ केल्याने, मागणी करुनही केंद्र सरकारने हस्तक्षेप न केल्याने व राज्य सरकारनेही केंद्र सरकारकडे पाठपुरावा न केल्याने विदर्भातील संत्र्याच्या निर्यातीत ८० ते ९० टक्के घट येऊन शेतकरी अडचणीत आला असणे, नैसर्गिक आपत्ती व अन्य कारणांमुळे विदर्भातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आला असताना सोयापेंड व कापूस आयात शुल्काबाबत निर्णय न घेतला जाणे, धान खरेदी केंद्र सुरु करण्यास झालेला अक्षम्य विलंब, धान खरेदीत झालेले घोटाळे, यामुळे अनेक शेतकऱ्यांचे धान विक्रीअभावी पडून असणे, विदर्भात अधिवेशन सुरु असताना माओवाद्यांनी स्थानिक आमदार आणि प्रशासनाला परिणाम भोगण्याची धमकी दिलेली असणे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड प्रकल्पामुळे आपल्या राज्यातील प्रकल्प खनिज प्रक्रिया करण्यासाठी अन्य राज्यात जात असणे, भिलाईप्रमाणे मोठ्या प्रकल्पाची संधी महाराष्ट्राने गमावली असणे, यावर फेरविचार होण्याची आवश्यकता असणे, विदर्भात खनिज उत्खनानंतर त्यावर आधारित उद्योगांची उभारणी विदर्भातच व्हावी, अशी विदर्भवासियांची मागणी असणे, नांदेड ते जालना या द्रुतगती जोडमहामार्गाचे काम तसेच समृध्दी महामार्गाचे विस्तारीकरण नागपूर ते भंडारा-गोंदिया आणि नागपूर ते गडचिरोली करण्याची आवश्यकता, समृध्दी महामार्गाच्या नियोजित आराखड्यातील कृषी क्लस्टरांचे काम प्राधान्याने हाती घेण्याची आवश्यकता, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात सरकारकडून बेफिकीरी व अनास्था दिसून आलेली असणे, मागील सरकारने केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन व निधीची तरतूद याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन कार्यक्रम अंमलबजावणीत उदासीनता दाखवली असणे, मुक्तीसंग्राम दिनी महाराष्ट्र शासनामार्फत कोणत्याही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली असणे, मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे प्रलंबित प्रश्न, तसेच, विदर्भातील सॅफ्रन प्रकल्प, राष्ट्रीय खनिकर्म आरोग्य संस्थान (एनआयएमएच), केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ (श्रमिक शिक्षा बोर्ड) या संस्था विदर्भातून इतर राज्यात स्थलांतरित करण्यात आल्याने विदर्भवासीयांमध्ये अन्यायाची भावना निर्माण झालेली असणे, मागील सरकारने २९ जून, २०२२ रोजी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला असला तरी त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नसणे, एमएसएमई गुंतवणुकीत विदर्भ व मराठवाडा हे दोन विभाग मागे पडले असताना या मागास आणि राज्याच्या इतर भागात होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीच्या व जमीन वाटपाच्या आदेशाला विद्यमान सरकारने स्थगिती दिल्यामुळे विदर्भ, मराठवाडा व राज्याच्या इतर भागात येणारे प्रकल्प रखडलेले असणे, मिहान प्रकल्पात गुंतवणूक करार झाले असताना कंपन्यांचा फारसा प्रतिसाद न मिळणे, रोजगार निर्मितीवर त्याचा परिणाम झाला असणे, मिहान प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील बुटीबोरी, मिहान सारख्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांची पिछेहाट

झालेली असणे, विदर्भ, मराठवाड्यात उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असणे, तसेच, विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित महाराष्ट्रातील आकांक्षित जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनरुज्जीवीत करण्यासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला नियतव्यय प्राधान्याने वितरित करण्याची आवश्यकता असणे, वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाचा आराखडा मागील सरकारने पूर्ण करुनही या सरकारने सहा महिन्यात काहीही प्रगती न करणे, बळीराजा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादी जलसंपदा विभागाच्या विदर्भातील योजना गेल्या सहा महिन्यात ठप्प होणे, विदर्भातील सिंचनाच्या सर्व प्रशासकीय बाबी या सहा महिन्यात प्रलंबित राहिल्या असणे, राज्यातील ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या वसतीगृह व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झालेला असणे, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागात विशेषत: विदर्भातील अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असणे, दरवर्षी नागपूर अधिवेशनात विदर्भाच्या कृषि, सिंचन, शिक्षण इत्यादी अनुशेषाबाबत चर्चा होणे, तथापि, अनुशेष दूर करण्यासाठी ठोस कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(गुरूवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**आठ : सर्वश्री रणधीर सावरकर, समीर कुणावार, प्रशांत बंब, अभिमन्यू पवार, भरतशेट गोगावले, राम सातपुते, ज्ञानराज चौगुले, राजेश पवार, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री संजय शिरसाट, नारायण कुचे, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, रमेश बोरनारे, प्रदिप जैस्वाल, ॲड आकाश फुंडकर, ॲड आशिष जैस्वाल, सर्वश्री दादाराव केचे, बालाजी कल्याणकर, संभाजी पाटील-निलंगेकर, मोहन मते, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री किशोर जोरगेवार, जयकुमार रावल, नरेंद्र भोंडेकर, संजय सावकारे, बच्चू कडू, मंगेश चव्हाण, भिमराव तापकीर, सुरेश भोळे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रशांत ठाकूर, नितेश राणे, बबनराव लोणीकर, संतोष दानवे, तानाजी मुटकुळे, हरिभाऊ बागडे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, श्री राणाजगजितसिंह पाटील, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, समाधान आवताडे, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, सुनिल कांबळे, ॲड राहुल कुल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री राम कदम, किसन कथोरे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री समीर मेघे, कृष्णा खोपडे, विकार कुंभारे, टेकचंद सावरकर, संजिवरेड्डी बोदकुरवार, मदन येरावार, डॉ. तुषार राठोड, प्रा.डॉ. अशोक उईके, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, प्रकाश भारसाखळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

मागील सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारा वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प असेल, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळवून हा प्रदेश सुजलाम् सुफलाम् करणारा प्रकल्प असेल अथवा विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी युती सरकारच्या काळात सन २०१७-१८ च्या दरम्यान मंजूर करण्यात आलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादींचे काम थंड बस्त्यात टाकण्यात येणे, विदर्भ-मराठवाड्यासह उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी व नागरिकांसाठी वरदान ठरणारा समृद्धी महामार्ग डिसेंबर २०२१ मध्ये सुरू होणे अपेक्षित असताना मागील सरकारच्या संथ कारभारामुळे प्रकल्पाचे काम रखडणे, परंतु नव्या सरकारने जनभावना लक्षात घेऊन नुकतेच समृद्धी महामार्गाचे पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करणे, त्याच वेळेस समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचेही काम तात्काळ पूर्ण होऊन त्याचेही लोकार्पण होण्याची जनतेची वाढती मागणी, एडीबीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जिल्हे निवडताना विदर्भातील जिल्ह्यांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास येणे, गत २ वर्षांत विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अतिवृष्टी होऊनही पुरेशी मदत शेतकरी बांधवांना न मिळणे, शेतकऱ्यांची दिवसा वीज मिळण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, मागील सरकारच्या कार्यकाळातील अक्षम्य दुर्लक्षामुळे विदर्भ व मराठवाड्याच्या अनुशेषात वाढ होणे, जुलै २०२२ मध्ये राज्यात सत्तांतर झाल्यानंतर विदर्भ-मराठवाड्याशी संबंधीत वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशाकडे वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेला चालना मिळणे, रस्त्यांचे जाळे विकसित करण्यासाठी विदर्भ-मराठवाड्यातील जिल्ह्यांना पुरेसा निधी प्राप्त होणे, विदर्भ, मराठवाडा व कोकणातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी नवीन सरकारने विशेष तरतूद करण्याची गरज, तसेच धान, सोयाबीन, कापूस व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर मिळावा याकरीता धान, सोयाबीन व संत्रा इत्यादी आधारीत प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याची तसेच, कापसावर प्रक्रिया उद्योगाला गती देण्यासाठी नवीन वस्त्रोद्योग धोरण आणण्याची ज्यामध्ये पारदर्शकता येऊन खऱ्या अर्थाने कापूस प्रक्रिया उद्योगाला चालना मिळेल अशा तरतूदी असण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात आरोग्य सुविधांना बळकटी मिळण्यासाठी या भागातील प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची नवीन शासनाने केलेली घोषणा व या घोषणेची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात जास्तीत जास्त रोजगार निर्मिती व्हावी याकरीता मागील सरकारने कोणतेही विशेष प्रयत्न न करणे, विशेषत: १८ महिन्यांमध्ये कॅबिनेट कमिटी ऑन इंडस्ट्रीजची एकही बैठक न

अप्रकाशित

घेणे, परंतु नवीन शासनाने नुकतीच ७०००० कोटींच्या प्रकल्पांना मान्यता देऊन विदर्भ-मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करणे, मागील ५ महिन्यांत या सरकारने विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अनेक प्रकल्पांना चालना मिळालेली असताना पुढील काळात वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणा-या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना तसेच एडीबी व एचएएम योजनेतंर्गत रस्त्यांचे जाळे विकसित करण्याची व संत्रा, धान, सोयाबीन व कापूस इत्यादी पिकांवर प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी नव्याने धोरण आखण्याची आवश्यकता, विशेषत: SMART, MAGNET योजनेतंर्गत प्रकल्प मंजूर करताना विदर्भ, मराठवाडा या मागास भागाला प्राधान्य देण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (POCRA) टप्पा-२ व जलयुक्त शिवार टप्पा-२ ची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्याची गरज, शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी याकरीता प्रत्येक सबस्टेशनला मुख्यमंत्री कृषी सौरवाहिनीला जोडण्याची आवश्यकता, तसेच नव्याने उद्योग विदर्भ-मराठवाड्यात यावेत याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**नऊ : अशासकीय विधेयके :-**

**(दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय विधेयकाच्या सूचना) (क्रमांक १ ते ७)**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१ — **श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२१ - **श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे.**

अग्रिम प्रत

(३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१ - **श्री. सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२२ - **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ – **श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(७) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२२ - **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

**दहा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(गुरूवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

(१) **श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३३**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

अप्रकाशित

(२) **श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १७**

"राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि इतर महानगरपालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका व त्यामुळे होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ.बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५९**

"राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैदयकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी यांची नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे, राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना (क्रमांक ४ ते** ६)

(४) **प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६९**

"राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या विशेषत: यवतमाळ जिल्हयातील बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी

अप्रकाशित प्रत

देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २३१**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबाना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६) **श्री. संजयमामा शिंदे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २१९**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

असुधारित प्रत

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २२ डिसेंबर, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा